**प्रेसनोट दि.१३/०९/२०१८**

## "वाहन चोरीतील इसमास अटक केले बाबत.."

## पो.हवा.दिनेश शिंदे, पो.शि.रियाज शेख, पो.शि. निशीकांत सावंत यांची उत्कृष्ट कामगिरी

## कोरेगांव पार्क पो स्टे पुणे शहर

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

कोरेगाव पार्क पो स्टे तपास पथकाचे कर्मचारी पो.हवा.दिनेश शिंदे, पो.शि.रियाज शेख, पो.शि. निशीकांत सावंत असे दि.११/०९/२०१८ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे हददी मध्ये पेट्रोलींग करीत बर्निंग घाट येथे आले असता,११/३० वा.चे सुमारास एक मुलगा जोरात मोटार सायकल घेवुन आला. त्यास थांबविण्याचा प्रयत्न केला असता तो पळुन जावुन लागला,तेव्हा स्टाफच्या मदतीने त्यास थोडया अंतरावर पकडुन त्याचे ताब्यातील मोटार सायकलनं.एम.एच/एम.वाय/२८२८ बाबत चौकशी केली असता,त्याचे नाव पत्ता विचारले असता त्यांने त्याचे नाव सुभाष आसाराम तौर असे सांगितले. मोटार सायकलचे लायसन्सचे कागदपत्रे मागितले असता,तो असमाधानकारक व उडवा-उडवीचे उत्तरे देवुन लागला. त्याचेकडे चौकशीकरता व त्याचे ताब्यातील असलेली मोटार सायकल बाबत खात्री केली असता,त्याचा संशय आल्याने त्यास कोरेगाव-पार्क पोलीस स्टेशन येथे घेवुन मोटार सायकल नंबरची पडताळणी केली असता,सदरची मो.सा. ही कोरेगाव-पार्क पोलीस स्टेशन गु.र.न.९१/२०१८,भादविक ३७९ मधील असल्याचे निष्पन्न झाले. त्यास सदर गुन्हयात अटक करुन मा.न्यायालयात हजर करुन त्यांचेकडुन मोटार सायकल ॲक्टीव्हा, लायसन्स व जर्किंग असा एकुण २०,०००/- रु किचा मुददेमाल हस्तगत करुन गुन्हा उघडकीस आणाला आहे. वाहन चोरी करणारा इसम हा मुळ बीडचा असुन तो शिक्षणासाठी पुणे आला असुन सध्या देवाची-आंळदी येथे राहत आहे.

सदरची कामगिरी मा.बच्चन सिंग,पोलीस-उप-आयुक्त,परिमंडळ-२,पुणे शहर,जयश्री गायकवाड, सहा.पो.आयुक्त,लष्कर विभाग,पुणे शहर, मदन बहाद्दरपुरे,वरिष्ठ पो.निरी. कोरेगाव पार्क पो स्टे पुणे यांचें मार्गदर्शनाखाली पो.हवा.दिनेश शिंदे, निशीकांत सांवत, रियाज शेख यांनी केलेली आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**